
# अण्णाभाऊ साठे

नागेश रविंद्र होनमोरे – द्वितीय वर्ष, यांत्रिकी अभियांत्रिकी



अण्णाभाऊ साठे : (१ ऑगस्ट १९२०-१८ जुलै १९६९). कथा, कादंबरी, लोकनाट्य, नाटक, पटकथा, लावणी, पोवाडे, प्रवास वर्णन अशा वेगवेगळ्या साहित्य प्रकारातील लेखन केलेले. आंतरराष्ट्रीय कीर्तीचे थोर, ख्यातनाम मराठी साहित्यिक अण्णाभाऊंचा जन्म सांगली जिल्ह्यातील वाटेगावचा. उपेक्षित समजल्या गेलेल्या मातंग समाजातील त्यांच्या वडिलांचे नाव भाऊ सिधोजी साठे, तर आईचे नाव वालबाई होते. त्यांचे मूळ नाव तुकाराम. जन्मस्थळ वाटेगाव (ता. वाळवा जि. सांगली). त्यांचे शालेय शिक्षण झालेले नव्हते. तथापि त्यांनी प्रयत्नपूर्वक अक्षरज्ञान मिळविले. १९३२ साली वडिलांसोबत ते मुंबईला आले. चरितार्थासाठी कोळसे वेचणे, फेरीवाल्यांच्या पाठीशी गाठोडे घेऊन हिंडणे, मुंबईच्या मोरबाग गिरणीत झाडूवाला म्हणून नोकरी, अशी मिळतील ती कामे त्यांनी केली. मुंबईत कामगारांचे कष्टमय, दुःखाचे जीवन त्यांनी पाहिले. कामगारांचे संप, मोर्चे पाहून त्यांचा लढाऊपणाही त्यांनी अनुभवला. १९३६ मध्ये भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे नेते काॅ. श्रीपाद अमृत डांगे यांच्या प्रभावाखाली आल्यावर ते कम्युनिस्ट पक्षाचे क्रियाशील कार्यकर्ते झाले. मुंबईत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांपासून ते स्वातंत्र्यवीर सावरकरांपर्यंत अनेक नेत्यांची भाषणे त्यांनी ऐकली. पक्षाचे ते करीत होतेच. तथापि वडिलांच्या निधनानंतर कुटुंबाची सगळी जबाबदारी अंगावर पडल्याने ते पुन्हा आपल्या गावी आले. तेथे बापू साठे या चुलतभावाच्या तमाशाच्या फडात ते काम करू लागले. तमाशातून जुन्या चालीचा सुरवातीचा साठा अण्णाभाऊंनी आत्मसात केला. मुंबईत परतताच त्यांना मॅक्झिम गोर्कीचे साहित्य वाचायला मिळाले. लिखाणाची उर्मी त्यांना याच साहित्यानं दिली. तो काळ १९४२ च्या चळवळीचा. ते स्वातंत्र्य समरांगणात सहभागी झाले. म्हणून इंग्रज सरकारने त्यांच्यावर पकड वारण्ट काढले. पोलिसांना चुकवीत ते मुंबईला आले. त्याच काळात त्यांची शाहीर अमर शेख, द. ना. गव्हाणकरांशी झाली. आपसातले हेवेदावे, गरीब जनतेला, शेतकऱ्यांना मिळणारा, छळणारा दारिद्र्याचा झगडा त्यांनी न्याहाळला होता. त्यातच मॅक्झिम गोर्कीच्या साहित्यानं प्रभावित झालेल्या त्यांच्या अंतरीच्या उर्मी प्रतिभेला बहर आला. त्यावेळी अमर शेख या ख्यातनाम मराठी लोकशाहीरांबरोबर अण्णाभाऊंचेही नाव लोकशाहीर म्हणून गाजू लागले. त्यांनी लिहिलेला 'स्तातिनग्राडचा पवाडा' १९४३ साली पार्टी या मासिकात प्रसिद्ध झाला. त्यांनी १९४४ साली शाहीर अमर शेख व गव्हाणकर यांच्या मदतीने 'लाल बावटा' कलापथक स्थापन केले कलापथकावर सरकारने बंदी घातली. 'अमळनेरचे

अमर हुतात्मे' आणि 'पंजाब-दिल्लीचा दंगा' या त्यांच्या काव्यरचना १९४७ साली प्रसिद्ध झाल्या. 'पंजाब-दिल्लीचा दंगा' या रचनेत सर्व प्रागतिक शक्तींना एकत्र येऊन शांतता प्रस्थापित करण्याचे आवाहन त्यांनी केले होते.

वर्गीय क्रांतीची उकल करण्यासाठी त्यांनी तमाशाचा बाज नेमकेपणात उचलला. तमाशातल्या नृत्यांगनेचे चाळ काढून टाकले आणि वीररसाच्या अंगाराचे चाळ चेतावणारा बंडखोर बंडागळी उभा केला. जुन्या कथेचा ढाचा ठेऊन नव्या युगाचा अकलेचा मोर्चा बांधला. तमाशात परंपरेने चालत आलेला गण बदलून टाकला. त्याजागी श्रमशक्तीला अभिवादन करणारा गण मोठ्या तडफेनं साकारला. आरंभलाच खऱ्या-खोट्याचे कोडे घालून सामान्यातल्या सामान्य माणसाचं कुतूहल वाढवीत त्यांनी आदिवासींची, कोळी-भिल्लांची, मांग-महार, रामोशांच्या व्यथा वेदनांचा हुंकार शाहिरीच्या लोबाजातून कथा-कादंबऱ्यातून मांडला.

अण्णाभाऊंनी अन्यायाविरुद्ध झगडणाऱ्या महाराष्ट्राच्या परंपरेचं स्मरण देऊन, संयुक्त महाराष्ट्र आंदोलनासाठी उभ्या महाराष्ट्राला प्रेरणा दिली. शाहीर अमरशेख, शाहीर गव्हाणकरांसमवेत ''माझी मैना गावावर राहिली, माझ्या जीवाची होतेया कायली'' ही लावणी अजरामर केली.

अकलेची गोष्ट (१९४५), देशभक्त घोटाळे (१९४६), शेटजींचे इलेक्शन (१९४६), बेकायदेशीर (१९४७), पुढारी मिळाला (१९५२), लोकमंत्र्यांचा दौरा (१९५२), ही त्यांची काही लोकनाट्य होत अण्णाभाऊंनी पारंपारिक तमाशाला आधुनिक लोकनाट्याचे रूप दिले. अण्णाभाऊंच्या साहित्यात त्यांची कथा-कादंबरीची निर्मितीही ठळकपणे नजरेत भरते. जिवंत काडतूस, आंबी, खुळंवाडी, बरबाद्या कंजारी (१९६०), चिरानगरची भुतं (१९७८), कृष्णाकाठच्या कथा हे त्यांचे काही कथासंग्रह. त्यांनी पस्तीस कांदबऱ्या लिहिल्या. चित्रा (१९४५), ही त्यांची पहिली कादंबरी. त्यानंतर ३४ कादंबऱ्या त्यांनी लिहिल्या. त्यांत फकिरा (१९५९, आवृ.१६- १९९५), वारणेचा वाघ (१९६८), चिखलातील कमळ, रानगंगा, माकडीचा माळ (१९६३), वैजयंता ह्यांसारख्या कादंबऱ्यांचा समावेश होतो. त्यांच्या फकिरा ह्या कादंबरीला महाराष्ट्र शासनाचा पुरस्कार मिळाला. वास्तव, आदर्श आणि स्वप्नरंजन यांचे मिश्रण त्या कादंबरीत आहे. सत्प्रवृत्तीचा, माणुसकीचा विजय हे अण्णाभाऊंच्या कादंबऱ्यांचे मुख्य सूत्र होय. त्यांच्या काही कादंबऱ्यांवर चित्रपटही निघाले. वैजयंता (१९६१, कादंबरी- वैजयंता), टिळा लावते मी रक्ताचा (१९६९, कादंबरी- आवडी), डोंगरची मैना (१९६९, कादंबरी- माकडीचा माळ), मुरली मल्हारीरायाची (१९६९, कादंबरी- चिखलातील कमळ), वारणेचा वाघ (१९७०, कादंबरी- वारणेचा वाघ), अशी ही साताऱ्याची तऱ्हा (१९७४, कादंबरी- अलगूज), फकिरा (कादंबरी- फकिरा), याशिवाय इनामदार (१९५८), पेंग्याचं लगीन, सुलतान ही नाटकेही त्यांनी लिहिली.

अण्णाभाऊ साठे हे देशातील उपेक्षित लोक जीवनाच्या अनुभवाचे साठे ठरले. गोर-गरीब शेतकरी. शेतमजर, श्रमिक, दलित, पददलितांच्या व्यथा-वेदना कथा कादंबऱ्यांमधून प्रकर्षाने उमटाव्यात त्यांची अशी धारणा होती. अण्णाभाऊंच साहित्य देशाबाहेर अगदी पोलंड, रशियातही लोकप्रिय झालं. जनमानसात प्रसिद्ध पावलं अण्णाभाऊंच्या मते ग्रामीण जीवन टिकाऊ काया आहे. तर शहरी जीवन दिलखुलास आहे. महात्मा फुले, शाहू महाराज, आगरकर, लोकहितवादी, महर्षी शिंदे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या समजाक्रांतीचा ग्रामीण दलित जीवनातच पाया आहे आणि त्याच पायावर लिहिलेल्या अण्णाभाऊंच्या कथा-कादंबऱ्या ही साहित्यक्षेत्रात समाज संक्रमणाची पहिली किमया आहे. अत्यंत अल्पशिक्षित असला तरी उपजत शाहिराला चिंतनाची जोड आणि वैश्विक कार्याची जोड असेल तर तो अजोड साहित्यिकही होऊ शकतो. हे अण्णा भाऊंनी दाखवून दिले. अण्णाभाऊंची लेखणी धारदार होती. पृथ्वी शेषांच्या मस्तकावर तारली नसून ती श्रमिकांच्या तळहातावर तरलेली

आहे, असं ते म्हणत. यांच्या लेखनाचा प्रेरणास्त्रोत सोशीत-उपेक्षितच होता.

अण्णा भाऊंची निरीक्षण शक्ती अत्यंत सूक्ष्म आहे. नाट्यमयता हाही त्यांच्या लेखनशैलीचा आगळा-वेगळा गुण. ज्या उपेक्षितांच्या जीवनातून अण्णाभाऊंनी अनुभूती घेतली. त्यातील क्षणाचा वेग आणि आवेग त्यांच्या लेखनात जाणवत राहतो. लेखनातील लवचिक भावचित्रे अंगासरशा मोडीने साकार करण्याची त्यांची लकबही स्वतंत्र आहे. लेखन शैलीवर त्यांनी सर्वस्व अर्पण केलं होतं.

रशियाच्या इंडो-सोव्हिएत कल्चरल सोसायटीच्या निमंत्रणावरुन ते १९६१ साली रशियात गेले. त्यांवर त्यांनी लिहिलेले प्रवासवर्णन लोकप्रिय झाले. त्यांचे व्यक्तिमत्त्व विविध कलागुणांनी भरलेले होते. ते उत्तम अभिनय करीत. हातात डफ घेऊन शाहिरी कवने मोठ्या तडफेने गात. बुलबुल, बासरी, हार्मोनियम अशी वाद्येही ते वाजवीत. दांडपट्टा फिरवीत. शिवाय स्वतःच्या लिखाणाव्यतिरिक्त त्यांनी नवयुग, युगांतर आणि आचार्य अत्रेंच्या मराठा वर्तमान पात्रातून अनेक लेख व पुस्तकांची परीक्षणे लिहिली.

अण्णाभाऊंचा शेवटचा काळ मात्र हलाखीत गेला. दारिद्र्य आणि एकाकी आयुष्य त्यांच्या वाट्याला आले. मराठी साहित्यातील प्रतिष्ठानकडून त्यांची तशी उपेक्षाच झाली. विपन्नावस्थेत गोरेगावच्या सिद्धार्थनगरात त्यांच निधन झाले.

अनेक विद्यापीठातून अण्णाभाऊंवर अनेक प्रबंध सिद्ध केले आहेत. त्यांच्या कथा-कादंबऱ्यांवर केवळ भारतीयच नव्हे. तर २२ परकीय भाषांत भाषांतरे झाली आहेत.

***

## सागरासारखं भरून यावं!

दुनियेकडे पाठ फिरवून
जवळ येऊन बसावं
श्रावण बोलावेल तुला
त्या श्रावणालाही धुडकारून
फुलांच्या ताटव्यासारखं फुलावं

बोचऱ्या हिवाळ्यातील शीतल
सकाळ बोलावेल तुला
आपले सोनेरी किरण हरवलेय म्हणून..
त्या थंडीला न जुमानता
स्पर्श पालविनं मोहरावं

वसंतऋतुचा वारा आमराईत
सैरभैर होऊन शोधेल तुला
त्याचा गंध हरवलाय म्हणून
त्या वाऱ्यालाही हुलकावणी देऊन
तू शोधत मला यावं

वटवृक्षाखाली बसलेला वाटसरू
हैराण होऊन हाका देईल
सावली नाहीशी झाली या विचारात
त्या वाटसरूकडेही न पाहता
आभाळासारखं न्याहाळत बसावं.

कातरवेळी चंद्र होऊन
शोधेन चहूदिशी तुला
फिरून येतील त्या माघारी आठवणी
विशाल सागरा भरती येतां
किनाऱ्याला येते नौकां

– संग्रहित


# अमृतांजन पूल

अमोल ईश्वर खोत – द्वितीय वर्ष, यांत्रिकी अभियांत्रिकी




**पार्श्वभूमी** : १६ एप्रिल १८५३ या दिवशी मुंबई ते ठाणे दरम्यान पहिली रेल्वे धावली. परंतु हा लोहमार्ग पुण्यापर्यंत नेण्यास पुढील १० वर्षे लागली. (उद्‌घाटन : १६ एप्रिल १८६३). सह्याद्रीच्या रांगा ओलांडण्याचे अतिशय अवघड असे अभियांत्रिकी आव्हान याचे प्रमुख कारण होते. १८५५-१८५६ मध्ये या प्रकल्पाचे कंत्राट फाविएल नावाच्या ब्रिटिश कंत्राटदाराला देण्यात आले. कामगारांच्या असंतोषामुळे ब्रिटिश सरकारने फाविएलचे कंत्राट रद्द केले. त्यानंतर सोलोमन ट्रेडवेल या कंत्राटदारावर उर्वरित काम सोपविण्यात आले. १८५९ मध्ये ट्रेडवेलने कामास सुरुवात केली. परंतु काही दिवसातच कॉलरा होऊन ते दगावले. पुढे त्यांची पत्नी एलिस यांनी हे काम १८५९ ते १८६३ दरम्यान पूर्णत्वास नेले.

**आर्थिक तरतूद** : पळसधारी ते खंडाळा या १३ मैल लांबीच्या रेल्वेमार्गात २,००० फूट उंची चढण्यासाठी २५ बोगदे, ८ उंच कमानदार दगडी पुलांची (Viaduct) उभारणी करावी लागली. या मार्गाचे उद्‌घाटन गव्हर्नर फ्रेअर यांनी केले. कर्जत ते खंडाळा या १५ मैल लोहमार्गाचा E ५९७,२२२/- इतका अनुमानित खर्च होता. परंतु प्रकल्प पूर्णत्वास नेण्यास E ५९०,०००/- इतकेच पौंड खर्च झाले होते.




**प्रकल्प आराखडा** : भोर घाटातील या रेल्वेमार्गाच्या नियोजनात जी आई पी रेल्वेचे मुख्य अभियंता जे. बर्कले यांनी महत्त्वाचे योगदान दिले. या मार्गाचे सर्वेक्षण करण्यास चार वर्षे (१८५३ ते १८५५) लागली. यामध्ये विविध पर्यायी मार्गाचा सारासार विचार केला गेला आणि त्यानंतर अंतिम मार्ग निवडला गेला. अमृतांजन पूल हे एक पूर्वनियोजित व्युत्क्रमी स्थानक होते. (Reversing station) होते. मंकी हिल ते खंडाळा हा ४ मैल खंड सर्वात अवघड होता आणि हा खंड कमीम कमी खर्चात पार करण्यासाठी व्युत्क्रमी स्थानक आवश्यक होते. या कल्पनेचा वापर जिथे अनुमानित चढाई रेल्वेच्या खेचण्याच्या क्षमतेच्या बाहेर जाते, तिथे कमी खर्चात अशा अडचणीवर मात करण्यासाठी केला जात असे. घाटातील रस्त्यावरील हेअर पिन वळण (उदा : मुंबई-पुणे द्रुतमार्गावरील घाटामधील अंडा पॉइंट) या संकल्पनेशी संलग्न ही कल्पना होती. अशी व्युत्क्रमी स्थानके आज देखील दार्जिलिंग हिमालयीन रेल्वे व निलगिरी रेल्वे (उद्रमंडल ते मेत्तुपलायम) ह्या मार्गावर अस्तित्वात आहेत.

मंकी हिल स्टेशन पासून गाडी वरती चढत व्युत्क्रमी स्थानकामध्ये येऊन थांबत असे व त्यानंतर तिचा उलट दिशेला म्हणजे खंडाळ्याकडे प्रवास सुरु होत असे. व्युत्क्रमी स्थानक ते




खंडाळा मार्ग हा द्रुतमार्गावरील सध्याच्या खंडाळा डाव्या बोगद्यामधून जाऊन पुढे त्याच मार्गाने (राजमाची पॉइंटच्या खालील रस्ता) खंडाळा स्टेशन गाठत असे. खंडाळा येथून मंकी हिलकडे जाणारी रेल्वे याच मार्गाने घाट उतरत असे.

अर्थातच रेल्वे परिचालनामध्ये असे व्युत्क्रमी स्थानक हा एक मोठा अडथळा बनते. परंतु रेल्वे बांधकामाच्या सुरुवातीच्या काळात याचा विचार झाला नसावा. प्रकल्पाचा खर्च कमी ठेवण्यावर जास्त भर दिला जात असे. १९२० मध्ये मुंबई ते पुणे या मार्गाचे विद्युतीकर करावयाचे वाटत होते. त्यावेळी मंकी हिल ते खंडाळा या मार्गाची पुनर्रचना करुन व्युत्क्रमी स्थानकाचा अडथळा दूर करणे कसे शक्य होईल, याचा विचार करण्याचे ठरविण्यात आले. १९२३-२४ च्या दरम्यान सखोल सर्वेक्षणानंतर मंकी हिल ते खंडाळा दरम्यान पुनर्रचित रेल्वेमार्गाची आखणी करण्यात आली. २.११ मैल लांबीच्या या नवीन मार्गाचा अनुमानित खर्च रु. ६६ लाख इतका होता. या मार्गातील जवळजवळ ८०% लांबी बोगद्यामधून जात होती (आजसुद्धा मुंबई-पुणे प्रवासात खंडाळा ते मंकी हिल दरम्यान आपण याची नोंद घेऊ शकतो). त्या काळात ही एक मोठी रक्कम होती. या सुधारणेमुळे होणारे अनेक फायदे लक्षात घेऊन जीआयपी रेल्वेच्या प्रबंधन समितीने या प्रकल्पाला मान्यता दिली.

घाटातील रेल्वे परिचालनामध्ये वार्षिक रु. ५ लाखाची बचत आणि मार्गाच्या रेल्वे गाड्यांच्या संख्यमध्ये व प्रत्येक रेल्वे गाडीच्या मालवाहन क्षमतेत लक्षणीय वाढ साध्य करणे हे या सुधारणेमागील कारण होते. मार्गाच्या विद्युतीकरणाबरोबर ही सुधारणा आवश्यक होती. १९२८ मध्ये हा मार्ग खुला करण्यात आला. त्यावेळी टाटा कन्स्ट्रक्शन कंपनी आणि दत्तो नारायण दातार ब्रदर्स, पुणे यांनी या बांधकामाचे कंत्राट घेतले होते. परंतु व्युत्क्रमी स्थानक ज्याच्यावर वसले होते. तो अमृतांजन पूल रेल्वेने तसाच राहू दिला. जुन्या पुणे-मुंबई रस्त्यावरुन खंडाळ्याहून खोपोलीकडे जाताना राजमाची पॉइंट ओलांडल्यावर या पुलाचे सुंदर दृश्य दिसत असे.

मुंबई-पुणे द्रुतगती मार्ग बांधताना अतिशय कौशल्यपूर्ण या पुलाखालून काढला गेला. परंतु या मार्गावर झालेल्या अवजड वाहनांच्या वाढत्या अपघातामुळे हा पूल उध्वस्त करण्याचे ठरवण्यात आले. १९० वर्षाचा हा पूल ४ एप्रिल २०२० रोजी पाडण्यात आला.

***

## Facebook

Computer च्या Chip सारखा
माणूस मनानं खुजा झालाय
अन् Mother नावाचा Board
त्याच्या आयुष्यातून वजा झालाय
Floppy disk drive मध्ये
आता संस्कारानाच जागा नाही
अन् फाटली मन जोडणारा
Internet वर धागा नाही
विज्ञानाच्या गुलामगिरीत
केवढी मोठी ही चूक
रक्ताच्या नात्यांनाही
आता लागतं Facebook....!!

**संग्रहित**

# आय-ओएस (iOS)

मानसी प्रकाश कुंभार – अंतिम वर्ष, संगणक अभियांत्रिकी

**मो**बाईल परिचालन प्रणाली. आय-ओएस (पूर्वीचे आयफोन ओएस; आयफोन परिचालन प्रणाली; iPhone OS) ही ॲपल इंकॉ.ने विकसित केलेली परिचालन प्रणाली केवळ त्यांच्या मोबाइल हार्डवेअरला समर्थन देण्याच्या हेतूने तयार करण्यात आली आहे. ही परिचालन सध्या आयफोन (iPhone OS). आयपॅड (iPad) आणि आयपॉड टच (iPad Touch) सह कंपनीच्या अनेक मोबाइल साधनांना समर्थन देते. आय-ओएस ही अँड्रॉइड नंतर जागतिक स्तरावर सर्वात लोकप्रिय मोबाइल परिचालन प्रणाली आहे. ॲपलने विकसित केलेल्या आयपॅड-ओएस (iPad OS) टिव्ही-ओएस (tv OS) आणि वॉच-ओएस (watch OS) या परिचालन प्रणालीचे मूळ आय-ओएस हेच आहे. ही परिचालन प्रणाली ॲपलची खासगी मालकीची असून याचे काही भाग ॲपल पब्लिक सोर्स लायसन्स आणि इतर परवाना अंतर्गत मुक्त करण्यात आले आहेत.

आय-ओएसच्या मुख्य आवृत्या प्रत्येक वर्षी प्रकाशित करण्यात येतात. सध्याची स्थिर आवृत्ती आय-ओएस 14 (iOS 14) ही आहे. तिला १६ सप्टेंबर २०२० रोजी प्रकाशित करण्यात आले. यामध्ये वापरकर्ताभिमुख अनेक बदल करण्यात आले. उदा. मोबाइलच्या मुख्य पटलावर इतर छोटी-यंत्रे (कळ-यंत्रे) ठेवण्याची, तसेच सिरी (siri) व फोन कॉल यांना सर्वांगी वापरकर्ताभिमुख इंटरफेस आहे. आय-ओएस 13 (iOS 13) या आवृत्तीला साहाय्य करणारे आय-ओएस 14 ला सुद्धा साहाय्य करतात त्यामुळे कुठल्याही मोबाइलच्या आवृत्या कालबाह्य झालेल्या नाहीत.

**इतिहास** : स्टीव्ह जॉब यांनी २००५ साली आय-फोन तयार करण्याचे नियोजिले असता मॅक (Mac) परिचालन प्रणालीला आक्रसणे किंवा आयपॉडला विस्तारित करणे असे दोन पर्याय त्यांकडे होते. त्यांनी पहिला पर्याय निवडला. मॅकिंटॉश (Macintosh) संघाचे नेतृत्त्व करणारे स्टॉक फॉरस्टॉल (Scott Forstall) तर आयपॉड संघाचे नेतृत्व करणारे टोनी फेडेल (Tony Fadell) यांमध्ये अंतर्गत सामना लावण्यात आला. फॉरस्टॉल यांनी ही स्पर्धा जिंकून आयफोन परिचालन प्रणालीची निर्मिती केली. आयफोनच्या विजेत्याला या निर्णयामुळे तृतीय-पक्ष विकसकाला व्यासपीठ उपलब्ध करून देणे शक्य झाले. बहुचर्चित डेस्कटॉप परिचालन प्रणालीचा मूलभूत वापर करून तृतीय-पक्ष मॅक विकसकाला कमीत-कमी प्रशिक्षण देऊन आयफोनकरिता सॉफ्टवेअर लिहिण्यास सांगितले. २००७ साली आयफोन परिचालन प्रणालीचे अनावरण करण्यात आले. आयफोन ॲप स्टोअर (iPhone App Store) याला ५०० ॲप्लिकेशनच्या (अनुप्रयोगासह) उपलब्धतेनुसार २००८ साली वापरण्यास खुले करण्यात आले. यावरील १ दशलक्ष ॲप हे टॅबलेट संगणकाशी सुसंगत असून, सर्व ॲप १३० अब्जापेक्षा जास्तवेळा डाउनलोड करण्यात आले आहे. ॲप इंटेलिजन्स फर्म सेंसर टॉवरने सदर ॲप स्टोअर हे २०२० पर्यंत ५ दशलक्ष ॲप पर्यंत पोहोचणार असल्याचे अनुमान काढले होते. ॲप हे ॲप्लिकेशन यांचे संक्षिप्त रूप असून संगणकीय ॲप्लिकेशन अर्थात अनुप्रयोग म्हणजे संगणकीय सॉफ्टवेअरचा समुह जे वापरकर्त्यांसाठी किंवा दुसऱ्या अनुप्रयोगासाठी विशिष्ट कार्य करते. (ॲप्लिकेशन यालाच अनुप्रयोग आज्ञावली किंवा अनुप्रयोग सॉफ्टवेअर असेही म्हणतात). २००७ साली ॲपलने आयपॉड टच ची घोषणा केली. आयफोनवर आधारित आयफोन पॉडची सुधारित आवृत्ती होती. २०१० साली बहुप्रतीक्षीत बहुवैशिष्ट्यांसह मिडिया टॅबलेट आयपॅड (iPad) सादर केले गेले. या आयपॅडचे पटल आयफोन आणि आयपॉड टच यांपेक्षा मोठे होते. वेब-ब्राउझिंग, वाचन, मल्टिमिडिया संरचना उदा. वर्तमानपत्र, ई-बुक, फोटो, व्हिडिओ, म्यूझिक, वर्ड प्रोसेसिंग,

व्हिडिओ गेम यांसारख्या सुविधा त्यात समाविष्ट करण्यात आल्या होत्या. वेब-ब्राउझिंगकरिता सफारीची (Safari) मोबाइल आवृत्ती समाविष्ट करण्यात आली. वाय-फायच्या साहाय्याने आणि पर्यायी ३G सेवा किंवा वापरकर्त्याच्या संगणकावरून मजकूर समक्रमित करणे शक्य झाले. जून २०१० साली ॲपलने आयफोन-ओएस याला आय-ओएस असे पुनर्निर्मित केले.

**आय-ओएसची वैशिष्ट्ये** : इंटरफेस (Interface). आय-ओएसचा इंटरफेस हा बहु-स्पर्शी (मल्टिटच; MultiTouch) हावभाव वापरून थेट हाताळणीवर आधारित आहे. इंटरफेस नियंत्रण घटकांमध्ये स्लाइडर (Slider), स्विच (Switch), आणि बटण असतात. ओएससोबत परस्परसंवादांमध्ये स्वाइप (Swipe), टॅप (Tap), पिंच (Pinch) आणि रिव्हर्स पिंच (Reverse Pinch) हे हावभाव समाविष्ट आहेत, या सर्व हावभावांचे आय-ओएस परिचालन प्रणालीप्रमाणे विशिष्ट परिभाषा आहे. निव्वळ उपकरण हालवून किंवा त्रिमितीय परिमाणात फिरवून अंतर्गत त्वरणमापणाचा वापर करून काही ॲप्लिकेशन वापरता येतात. वैयक्तिक संगणकातील डेस्कटॉप प्रमाणेच आय-ओएस उपकरण होम स्क्रीनला सुरू करता येते. आय-ओएस उपकरणातील होम स्क्रीन हे प्राथमिक मार्गक्रमण करणारे आणि माहितीचे केंद्र आहे. आय-ओएस होम स्क्रीन ही प्रामुख्याने ॲप आयकॉन (चिन्ह) आणि विजेट्स (Widget) करिता तयार करण्यात आले आहे. ॲप आयकॉन हे विशिष्ट ॲप्लिकेशनकरिता तयार करण्यात आले आहे. तर विजेट्स याला जिवंतपणा, मजकूर स्व-अद्ययावतीकरण उदा. हवामानाची माहिती, ई-मेलमधील इनबॉक्स किंवा होम स्क्रीनवरील थेट माहितीचे प्रक्षेपण यांकरिता तयार करण्यात आले आहे. होम स्क्रीनच्या वरच्या बाजूला स्थितीदर्शक पट्टी (स्टेटस बार : Status bar) असते. तेथे उपकरणाची माहिती आणि जोडणी (कनेक्टिव्हिटी) दर्शविण्यात येते. स्थितीदर्शक पट्टीचे नियंत्रण केंद्र (Control Center) आणि अधिसूचना केंद्र (Notification Center) असे दोन घटक आहेत. नियंत्रण केंद्र नवीन आयफोनवर, खाली-वर उजवीकडून खाली ओढले जाऊ शकते, ज्यामुळे सेटिंग्ज (setting) उघडल्याशिवाय उपकरणाला अधिक जलद व्यवस्थापित करण्यासाठी विविध टॅगलमध्ये प्रवेश मिळतो. उदा. ब्राइटनेस, व्हॉल्यूम, वायरलेस कनेक्शन, म्यूझीक प्लेयर इ. व्यवस्थापित करणे सहज शक्य आहे.

होम स्क्रीनवरून डावीकडून खाली स्क्रोल केल्यास अधिसूचना केंद्र उघडते, ते आय-ओएसच्या नवीनतम आवृत्यांमध्ये लॉक स्क्रीन (Lock screen) सारखेच आहे. हे कालक्रमानुसार सूचना प्रदर्शित करते आणि त्यांना अनुप्रयोगाद्वारे गटबद्ध करते. काही ॲप्सच्या अधिसूचनेवरून थेट संवाद साधणे शक्य आहे. उदा. यावरून थेट संदेशाला उत्तर देता येते. अधिसूचना दोन पद्धतीमध्ये पाठवल्या जातात. पहिले म्हणजे महत्त्वाच्या सूचना लॉक स्क्रीनवर प्रदर्शित केल्या जातात आणि विशिष्ट ध्वनीद्वारे सांकेतिक केल्या जातात. त्या एक चेतावणी बॅनर किंवा ॲप बॅज चिन्हाद्वारे तर दुसरी पद्धत ते अधिसूचना केंद्रात प्रदर्शित केले जातात. परंतु ते लॉक स्क्रीनवर दाखवले जात नाही, किंवा ते चेतावणी बॅनर, बॅज आयकॉन किंव ध्वनीद्वारे सूचित केले जात नाहीत. होम स्क्रीन अनेक पृष्ठांनी बनलेली असू शकते. ज्यामध्ये वापरकर्ता पुढे-पुढे स्वाइप करू शकतो. हे करण्याचा एक मार्ग म्हणजे प्रत्येक पृष्ठावर दर्शविलेला ''बिंदू'' दाबून ठेवणे आणि डावीकडे किंवा उजवीकडे स्वाइप करणे. शेवटच्या पानाच्या उजवीकडे, ॲप लायब्ररी उपकरणावर स्थापित केलेल्या ॲप्सची सूची आणि वर्गीकरण असते. प्रत्येक श्रेणीतील ॲप्स त्यांच्या वापराच्या वारंवारतेवर आधारित असतात. अलीकडे प्रवेश केलेले ॲप ''अलीकडील'' श्रेणीमध्ये असते. वापरकर्ते त्यांना हवे असलेले ॲप शोधू शकतात किंवा त्यांना वर्णक्रमानुसार ब्राउझ करू शकतात.

आय-ओएसवर मुख्य पृष्ठ बटण सहसा वर उजवीकडे असते. ॲप्लिकेशनमध्ये परत जाण्यासाठी जवळजवळ नेहमीच ''परत(बॅक; Back)'' बटण असते. आपण चार वेगवेगळ्या मार्गांनी परत जाऊ शकता, ते संदर्भानुसार बदलते. १. प्रदर्शनाच्या (डिस्प्ले) वरच्या डाव्या बाजूला ''परत'' बटण दाबणे, २. स्क्रीनच्या डाव्या काठावरून उजवीकडे स्वाइप करणे, ३. स्क्रीनच्या वर उजवीकडे ''समाप्त'' क्रिया दाबणे, ४. स्क्रीन सामग्रीवर खाली स्क्रोल

करणे.

पृष्ठाचे शीर्षक व्यावहारिकदृष्ट्या नेहमी उपस्थित असते आणि खूप दृश्यमान असते, परंतु वापरकर्ता खाली स्क्रोल केल्यावर ते संकुचित होते. कधीकधी आय-ओएसवर महत्त्वाच्या पृष्ठ क्रिया कमी टूलबारवर दिसतात.

ॲप्लिकेशन : (अनुप्रयोग; Application). आय-ओएस उपकरणे ॲपलने विकसित केलेल्या पूर्व-स्थापित ॲप्ससह येतात. यांमधे मेल, नकाशे, टीव्ही, संगीत, फेसटाइम, वॉलेट, हेल्थ इ.चा समावेश होतो. ॲप्लिकेशन (ॲप्स) हे ॲप्लिकेशन सॉफ्टवेअरचा सर्वात सामान्य प्रकार आहे, जो आय-ओएसवर स्थापित केला जाऊ शकतो. ते ॲप स्टोअर डिजिटल स्टोअरच्या अधिकृत यादीमधून डाउनलोड केले जातात. येथे ॲप्स वापरकर्त्यांसाठी उपलब्ध करण्यापूर्वी सुरक्षा तपासणीच्या अधीन असतात. सॉफ्टवेअर वितरकाने प्रदान केलेल्या आयपीए फाइलवरून अनधिकृत मार्गाने आय-ओएस ॲप्लिकेशन थेट स्थापित केले जाऊ शकतात. ते आय-ओएस सॉफ्टवेअर डेव्हलमेंट किट (एसडीके; SDI) वापरून लिहिले गेले आहेत आणि बहुतेकदा एक्सकोडसह एकत्रितपणे स्वीफ्ट (Swift) आणि ऑब्जेक्टिव्ह-सी (Objective-c) सह अधिकृतपणे समर्थित प्रोग्रामिंग भाषा वापरतात. इतर कंपन्यांनी देखील अशी साधने तयार केली आहेत, जी त्यांच्या संबंधित प्रोग्रामिंग भाषा वापरून मूळ आय-ओएस ॲप्सच्या विकासासाठी परवानगी देतात.

आय-ओएससाठी अनुप्रयो मुख्यतः युजर इंटरफेस किट (UIKit : यूआय-किट) प्रोग्रामिंग फ्रेमवर्कचे घटक वापरून तयार केले जातात. हे अनुप्रयोगांना सुसंगत स्वरूप आणि ओएससह अनुभवण्याची अनुमती देते व सानुकूलित करते.

आय-ओएस ॲप स्टोअरमधून वेगळे अॅप देखील काढले गेले. सिरी फोनच्या क्रिया करणे, मूलभूत माहिती तपासणे, कार्यक्रम आणि स्मरणपत्रे शेड्यूल करणे, डिव्हाइस सेटिंग्ज हाताळणे, इंटरनेट शोधणे , क्षेत्रांमध्ये मार्गस्थ करणे, मनोरंजनावर माहिती शोधणे आणि आय-ओएस- समाकलित ॲप्ससह व्यस्त राहण्यास सक्षम असलेल्या वापरकर्त्याच्या आदेशांच्या विस्तृत श्रेणीचे समर्थन करते. २०१६ मध्ये आय-ओएस १०च्या प्रकाशनासह, ॲपलने तृतीय-पक्ष मेसेजिंग ॲप्ससह पेमेंट्स, राईड-शेअरिंग आणि इंटरनेट कॉलिंग ॲप्ससह सिरीमध्ये मर्यादित तृतीय-पक्ष प्रवेश उघडला. आय-ओएस ११ च्या रिलीझसह, ॲपलने सिरीचे आवाज अधिक स्पष्ट आणि मानवी आवाजासाठी अद्ययावत केले. ते आता फॉलो-अप प्रश्न आणि भाषा-भाषांतर आणि अतिरिक्त तृतीय-पक्ष क्रियांना समर्थन देते.

खेळाचे ठिकाण (Game centre; गेमसेंटर) : गेमसेंटर हे ऑनलाइन मल्टीप्लेअर 'सोशल गेमिंग नेटवर्क' ॲपलद्वारे प्रकाशित करण्यात आले. हे वापरकर्त्यांना मित्रांना गेम खेळण्यासाठी आमंत्रित करणे, मॅचमेकिंगद्वारे मल्टीप्लेअर गेम सुरू करणे, त्यांच्या कर्तृत्वाचा मागोवा घेणे आणि लीडरबोर्डवर त्यांच्या उच्च स्कोअरची तुलना करण्याची परवानगी देते. आय-ओसए ५ आणि त्यावरील प्रोफाइल फोटोंसाठी समर्थन जोडते.

२०१० साली ॲपलने प्रस्थापित केलेल्या आय-ओएस ४ पूर्वावलोकन कार्यक्रमादरम्यान गेम सेंटरची घोषणा करण्यात आली. ऑगस्टमध्ये नोंदणीकृत ॲपल विकसकांसाठी पूर्वावलोकन जारी केले गेले. २०१० साली आय-ओएस ४.१, आयफोन ३GS आणि आयपॉड टच द्वितीय पिढीपासून चौथी पिढीपर्यंत आय-ओएस ४.१ सह प्रकाशित करण्यात आले. गेम सेंटरने आय-ओएस ४.२.१ सह आयपॅडवर सार्वजनिक पदार्पण केले. आयफोन ३G, मूळ आयफोन आणि पहिल्या पिढीतील आयपॉड टचसाठी समर्थन नाही (नंतरच्या दोन उपकरणांमध्ये गेम सेंटर नव्हते कारण त्यांना आय-ओएस ४ मिळाला नाही). तथापि, गेम सेंटर अनधिकृतपणे आयफोन ३G वर हॅकद्वारे उपलब्ध आहे.

# घारापुरी लेणी

एकता बाबासाहेब पाटील – मेकॅनिकल द्वितीय वर्ष

महाराष्ट्र राज्याची राजधानी मुंबई पासून समुद्रामध्ये ११ किलोमीटर अंतरावर असणाऱ्या घारापुरी या बेटावर ही लेणी असून ती 'एलिफंटा केव्हज' म्हणूनही ओळखली जातात. सन १९८७ मध्ये घारापुरी लेण्या ना जागतिक वारसा स्थळांच्या यादीमध्ये समाविष्ट केले आहे. मध्ययुगीन काळातील ही लेणी अत्यंत आकर्षक व सुंदर असून भारतीय इतिहासाचा व सुंदर वास्तुकलेच एक उत्कृष्ट नमुना आहेत. एलिफंटा गुहा ही घारापुरीची लेणी या नावानेही ओळखली जातात. इसवी सन पाचव्या व सहाव्या शतकाच्या दरम्यान या गुहा भगवान शंकराच्या गुफा म्हणून प्रसिद्ध होत्या त्या गुहांचे दोन गट असून पहिला गट हिंदू धर्माशी संबंधित असून दुसरा गट धर्माशी संबंधित आहे.

मुंबई पर्यटन करत असताना मुंबई मधील सर्व पाहण्यासारखी ठिकाणे तुम्ही पाहिली असतील व प्रसिद्ध सिद्धिविनायकाचे दर्शन घेतले असेल तर Elephanta caves अर्थात घारापुरीची लेणी जरूर पाहा. मुंबईच्या गेट वे ऑफ इंडिया इथून घारापुरीच्या लेण्यासाठी बोटी मिळतात.

एलिफंटा केव्हज अर्थात घारापुरीच्या लेण्यांच्या निर्मितीचा काळ हा साधारपणे इसवी सन ९०० ते १३०० च्या दरम्यान चा असावा. असा इतिहासकारांचा अंदाज आहे. घारापुरीची लेणी एका अखंड पाषाणामध्ये कोरण्यात आली आहेत. अत्यंत प्राचीन अशी ही लेणी असून त्याकाळी इतक्या दुर्गम ठिकाणी इतकी सुंदर कलाकृती कशी निर्माण केली असेल? याची कल्पना करणेही अवघड जाते. प्राचीन काळी घारापुरी या गावाचे नाव त्रिपुरी असे होते. कोकणातील मौर्य वंशाची घारापुरी ही राजधानी होती. त्यानंतर चालुक्य, राष्ट्रकूट, यादव आणि मोगल यांनी या परिसरामध्ये आपली सत्ता प्रस्थापित केली होती. सोळाव्या शतकाच्या सुरुवातीला घारापुरी हे बेट प्रथम पोर्तुगिजांच्या ताब्यात गेले. त्यानंतर छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळात हे बेट मराठ्यांनी हस्तगत केले. सन १९७४ मध्ये मराठ्यांच्या कडून हे बेट इंग्रजांच्या ताब्यात गेले.

**घारापुरीच्या लेण्यांचे स्थान महत्त्व आणि वैशिष्ट्य**

घारापुरी बेट किंवा घारापुरी हे दक्षिण मुंबईतील बॉम्बे जवळच्या खाडी मधील एक बेट आहे. या बेटाचे क्षेत्रफळ समुद्राच्या भरतीच्या वेळी सुमारे १० चौरस किलोमीटर आणि ओहोटीच्या वेळी १६ चौरस किलोमीटर असते. बेटाच्या दक्षिणेस घारापुरी नावाचे छोटेसे गाव आहे. या बेटावरील डोंगरांमध्ये एकूण ५ लेणी खोदलेली असून या लेण्यांचे शिल्प काल काम पंथाचे असल्याचे दिसून येते. त्या शिल्पांमध्ये अनेक प्राचीन काळातील निवडक शिवकथा कोरलेल्या दिसून येतात. या कथांपैकी शिवपार्वती विवाह गंगावतरण तांडव नृत्य अंधकासुर वध इत्यादी शिल्पे अतिशय रमणीय असून प्राचीन काळातील भगवान शंकराचे जीवनच या शिल्पांच्या रूपाने आपल्यापुढे सादर होते.

घारापुरी येथील मुख्य गुहा ही शिव गुहा किंवा गुहा क्रमांक एक म्हणून ओळखली जाते. ही एक महाकाय आकाराची गुहा असून या गुहेमध्ये २७ चौरस मीटरचा सभामंडप आहे. या गुहेमध्ये एक मोठे दालन असून या दालनाच्या मध्यभागी अकरा

हात उंचीची एक त्रिमुखी मूर्ती आहे. या मूर्तीची तीनही तोंडे अतिशय सुंदर असून त्यांच्या मुकुटावर अत्यंत विलक्षण कलाकुसर केलेली आहे. ब्रम्हा-विष्णू-महेश यांच्या संयुक्त मूर्तीला त्रिमूर्ती असे म्हणतात. परंतु इथे असलेल्या त्रिमुर्तीमध्ये उमा महेश आणि रूद्र यांची रूपे दिसतात.

**गुहा क्रमांक दोन ते पाच**

घारापुरी येथील वा क्रमांक दोन ते पाच मोडकळीस आलेल्या अवस्थेमध्ये १९७० च्या दशकात सापडल्या गुहा क्रमांक दोन मध्ये चार स्तंभ असून दोन लहान खोल्या दिसून येतात. या मंदिरामधील वास्तुकला प्रेक्षणीय अशी आहे. या गुहेत ऊंच गुहा क्रमांक तीन साठी द्वार आहे. गुहा क्रमांक तीन येथे मोडकळीस आलेल्या अवस्थेतील मंदिर पाहायला मिळते. असे मानले जाते की हे मंदिर भगवान शंकराचे होते. गुहा क्रमांक चार हीसुद्धा मोडकळीस आलेल्या अवस्थेमध्ये असून या ठिकाणी एक मंदिर आहे. या मंदिराच्या पाठी मागे एक छोटेसे शिवलिंग पाहायला मिळते.

**गुहा क्रमांक सहा व सात**

घारापुरी येथील गुहा क्रमांक सात ही उंच टेकडीवर असून या गुहेला सीताबाई ची गुहा या नावानेही ओळखले जाते. पोर्तुगीज राजवटीमध्ये या ठिकाणी एक चर्च बांधण्यात आले होते. गुहा क्रमांक सहा व सात या दोन्ही गुहा मोडकळीस आलेल्या अवस्थेमध्ये आहेत. गुहा क्रमांक सात जवळच एक कोरडा तलाव पाहायला मिळतो. या तलावास बौद्ध तलाव असेही म्हटले जाते.

**घारापुरीची लेणी सुरू व बंद होण्याच्या वेळा**

मुंबईजवळच्या समुद्रात असलेली घारापुरीची लेणी पाहण्यासाठी दररोज असंख्य पर्यटक या गुहांना भेट देण्यासाठी येतात. पर्यटकांसाठी ही लेणी सकाळी नऊ ते सायंकाळी साडेपाच वाजेपर्यंत उघडी असतात.

**घारापुरीच्या लेण्यांना भेट देण्यासाठी सर्वात चांगला कालावधी**

जर तुम्ही घारापुरीची लेणी पाहण्यासाठी जाणार असाल? तर तुम्हाला सांगतो की, एलिफंटा केव्हज पाहण्यासाठी सर्वात चांगला कालावधी नोव्हेंबर ते फेब्रुवारी या महिन्यांच्या दरम्यान चा मानला जातो. कारण या काळात मुंबई व परिसरातील वातावरण अल्हाददायी असते. उन्हाळ्यामध्ये याठिकाणी उष्णता खूप असते. तर पावसाळ्यामध्ये भरपूर पाऊस असल्याने पर्यटनामध्ये अडथळा येतो.

***

## हे अंतराळवीरांनो

हे अंतराळवीरांनो!
ढगांच्या पल्याड जाऊन, चंद्रावर पाय रोवून
सुखरूप परत आलात,
तुम्हाला मानाचा मुजरा करतो
अंतराळाचा शोध घेण्यास तुम्ही केलेले उड्डाण
जगाला दिले अंतराळ ज्ञान
अनंताच्या पोकळीत संचार करण्याचे सामर्थ्य
माणसाच्या पंखात आले,
हे तुम्ही चराचराला दाखवून दिले
तुमच्या दिग्विजयाने साऱ्या मानवजातीचा जय झाला
अंतराळाचा तो शोध घेऊ लागला
एक जुनीच शंका, पायातल्या भोवऱ्याप्रमाणे
मनात खुपते आहे.
माणसाचे माणुसपणाचे अंतर तुटते आहे
अंतराळ भेदणाऱ्या वीरांनो!
पृथ्वीपासून चंद्राचे अंतर अचूक मोजणाऱ्या बहाद्दूरांनो!
आपल्यापासून खरा माणूस किती अंतरावर आहे
एवढे मोजाल काय?
आणि.....
ते अंतर तोडणारी याने
लवकरात लवकर बांधून दयाल काय?

– संग्रहित

# प्रवास रायगडचा

शुभम शिरोळे – तृतीय वर्ष, यांत्रिकी अभियांत्रिकी

रायगड स्वराज्याची राजधानी... प्रत्येक मराठ्याच्या मनात अभिमानाची जागा. माझे रायगडवर जेंव्हापासून जायचे ठरले. अगदी तेंव्हापासून हा दिवस कधी येतोय याचीच आतुरतेने वाट पाहत होतो आणि तो दिवस आला. २७ जुलै २०१२ चा शुक्रवार. मग काय संपूर्ण तयारीनिशी मी आणि माझे मित्र तयार झालो आणि निघालो रायगडला. रात्री १२.०० वाजता मुंबईवरून प्रवास चालू केला आणि तो सरळ रायगडच्या दिशेने. रात्री ३.०० वाजता पोहचलो. रायगड जवळच एका मित्राच्या घरी आम्ही थांबलो. त्या रात्री आम्हाला झोप लागलीच नाही. कारण प्रत्येकाला रायगडवर जायची ओढ लागली होती.

बघता बघता ५.०० वाजले. स्नान वगैरे करून आम्ही निघालो ते थेट रायगडवर... रायगडाच्या पायथ्याशी पोहचलो तेंव्हा कळले कि स्वर्ग म्हणजे काय असतो. कसा असतो. चोहीकडे धुके पसरलेले... आणि रिमझिम पाऊस... अंगावर जॅकेट चढवले. आणि निघालो पायऱ्याच्या दिशेने पहिल्याच पायरीला वंदन केले आणि तिच्या मातीचा टिळा कपाळी लावला आणि पायऱ्या चढू लागलो. चढता चढता वाटेतील कोसळणाऱ्या धबधब्यांवर आनंद लुटत आम्ही झप झप पायऱ्या चढू लागलो. जस जसा गड जवळ येत होता. तस तसा त्याला डोळ्यात भरायला जीव आतुरला होता. गडाचा माथा कधी धुक्यात हरवत होता तर कधी दुरूनच दिसत होता. हिरवीगार चादर अंगावर ओढलेला सह्याद्री मनात भरत होता. सह्याद्रीचे कडे नटून दिसत होते. वरून दिसणारी छोटी छोटी गावे हाकेच्या अंतरावर भासत होती आणि आता पावसाने पण आता चांगलाच जोर धरला होता. सोसाट्याचा वारा आणि दाट धुके आणि जोरदार पाऊस यात बाजूला उभा असणारा मित्र ही दिसत नव्हता.

गडावर पोहोचताच समोर होळीच्य मांडावरील शिवमूर्ती पाहून जो काही हर्ष मनात झाला त्याच वर्णन मी करूच शकत नाही. गुगल वर रायगड सर्च केल्यावर ज्या शिवमूर्तीचे दर्शन व्हायचे. ती शिवमूर्ती समोर पाहून डोळे भरून आले. जावून सरळ राजांचे पाय धरले. डोळ्यात आनंदाश्रू तरळले आणि मस्तक झुकवून एक मुजरा केला. शिवचरणाची धूळ कपाळी लावली आणि हातात असणारा भगवा त्या मूर्तीच्या शिवछत्राला बांधला... राजांना डोळे भरून पाहत... पाहातच बसलो...

यावरून दोन ओळी मनात येवून गेल्या...

**'काय तुमचे रूप राजे काय तुमचे तेज**
**छत्रपती जगताचे तुमची गरुडाची झेप**
**शिवशंकर तुम्ही या कैलासाचे राणा तुम्ही या स्वराज्याचे**
**सिंहासन विराजित गोब्राम्हण प्रतिपालक रक्षक तुम्ही रयतेचे**
**तुमचे चरण स्पर्श करुनी आज पाणी डोळा आले...**
**राऊळ तुमच पाहुनी मन मनात आनंदले**
**छाती फुगली गर्वाने... तुम्हास पाहील राजे... मी आज तुम्हास पाहिले'**

होळीच्या मांडावरून सरळ निघालो तो जेथे शिवराज्याभिषेक झाला... मराठ्यांचा राजा छत्रपती झाला... जिथे आई जिजाऊंच्या डोळ्यात आनंदाश्रू आला... जिथे राजांना आपला बाजी, तानाजी आठवला... जिथे कित्येक बलिदानाचा... वीरांचा सत्कार झाला... तिथे मी पोहचलो होतो. तिथेच रयतेचा पोशिंदा छत्रपती झाला... ती जागा त्या जागेचा प्रत्येक कोना मी मनात साठवत होतो... तो भव्य दरबार पाहून... मन थक्क झाले होते. तिथे असणाऱ्या सिंहासनारूढ राजांचे दर्शन घेवू लागलो आणि एक जोरात आरोळी ठोकली आणि माझ्या मित्रांनीही मला साथ दिली ती आरोळी म्हणजे... माझ्या राजाचे गुणगान... माझ्या राजाचे कर्तृत्त्व...

त्यांचा पराक्रम... त्यांच रयतेवर असणार प्रेम... ती आरोळी म्हणजे एक समृद्ध शिवराज्य...

**'प्रौढम प्रताप पुरंदर. क्षत्रिय कुलवंत गोब्राम्हण प्रतिपालक**
**हिंदवी स्वराज्य संस्थापक ब्रम्हांडनायक सिंहासनाधीश्वर महाराजाधिरा श्रीमंत छत्रपती शिवाजी महाराज कि जय'**

या गर्जनेचा नाद संपूर्ण दरबारात घुमला... माझ्या मित्रांच्या साथीबरोबरच तिथे आलेल्या शिवभक्तांचीही साथ लाभली आणि संपूर्ण परिसर शिवमय झाला...

मग संपूर्ण रायगडाची सैर केली. रायगडाबद्दल बरील माहिती गोळा केली... मनात ठसवली आणि छाती गर्वाने फुगत होती... जे जे काही पाहत होतो ते एक स्वप्नच भासत होत... आजचा दिवस कधीच सरू नये... असंच वाटत होत... खुबलढा बुरुज, हिरकणीचा बुरुज, हत्ती तलाव, गंगासागर तलाव, अष्ट मंडळाचे वाडे, राण्यांचे महाल, गोदामे, पालखी दरवाजा, मेना दरवाजा, राजभवन... नगारखाना... बाजारपेठ...

आणि आता पावले वळली ती जगदीश्वराच्या मंदिराकडे... शिवछत्रपतींच्या समाधीकडे... दाट धुके आणि जोराचा पाऊस यातून वाट काढत आम्ही निघालो ते जगदीश्वराच्या मंदिराच्या दिशेने... मंदिर समोर येताच पायातील पादत्राणे काढली आणि मंदिराच्या पायऱ्यांना स्पर्श करत आत शिरलो. समोरच जगदीश्वराचे शिवलिंग आणि मस्तक तिथे टेकवले आणि 'ओम नमः शिवाय' चा मंत्र बोललो आणि आवाज मंदिरात घुमला तो आवाज मनाला अशी चिरकाल शांती देवून गेला कि अजूनही त्याचा नाद कानात ऐकू येतोय... आणि मनात विचार आला... याच मंदिरात... येथेच बसून... याच शिवलिंगावर राजांनी अभिषेक केला असेल असेच दर्शन घेतले असेल. या जागेला राजाच्या पावलाचा गंध अजूनही येत असेल... तेथील प्रत्येक चराचराला राजांचा स्पर्श झाला असेल... आणि हे सार आठवून जी काही मनाची चलबिचल झाली... जी गात झाली ती अजूनही कायम आहे... जगदीश्वराला वंदन करून बाहेर आलो आणि समोरच असणारी राजांची समाधी पाहून मन गहिवरले...


'येथेच निजला माझा राजा... येथेच झाला राजा रयेतेचा छत्रपती
अनंत काळासाठी वसला रायगडी... अमर होवुनिया चराचरी...
स्वप्न साकार करून स्वराज्याचे... घडविले हिंदवी स्वराज्य मराठ्यांचे
गुलामीची लक्तरे येथेच ठेचली... आणि मगच शांत झाला राजा रायगडी राऊळी'

आता वेळ आली होती ती परतीची... आणि जड पावलांनी आम्ही आता गडाचा निरोप घ्यायचा ठरवला... निरोप घेताना पुन्हा होळीच्या मांडावर आलो. आणि समोरच्या शिवमूर्तीकडे पाहतच बसलो... आता गड सोडायचा हे मन काही मानत नव्हत... आणि मी गडाचा निरोप घेतला. तो पुन्हा गडावर येईन अस ठरवूनच...

रायगड पुन्हा डोळ्यात अवतरला... गड सोडता सोडता या ओळी मला सुचल्या...

**हे शिवराया...**

**आज नयन माझे सुखावले तुझं राऊळ पाहून**
**रायगडाच्या शिवराजा तुला मुजरा स्मरून**
**किर्ती तुझी अफाट आज पाहिली डोळ्यांनी**
**कसा स्वर्ग नटलेला सह्याद्री डोंगरदऱ्यांनी**
**तेज तुझे पाहून शीर झुकले चरणाशी**
**काय गुण वर्णू सह्याद्रीचे टिळा लाविला लल्लाटी**
**हे शिवराया... शिवतेजा... राजे शोभता आम्हाशी**
**आज धन्य झाला गणेश जव कवटाळले तव चरणाशी**



# जीवन व्यापी प्लॅस्टिक (वैज्ञानिक लेख)

''आई, येते गं! उशीर होतोय मला!'' असे म्हणत शिल्पा घाईघाईने घराबाहेर पडली सुद्धा. बरोबरीच्या मैत्रीणी आधीच स्टॉपवर येऊन थांबल्या होत्या. दिवस पावसाळ्याचे असल्याने हातात प्लॅस्टिकच्या दांड्याची नवी कोरी छत्री घेऊन ती वेळेत स्टॉपवर आली. आज तिच्या कॉलेजवर कार्यक्रम होता. पुण्याहून येणारे एक वक्ते प्लॅस्टिकच्या प्रदूषणावर मार्गदर्शन करणार होते. घाईघाईत महाविद्यालयाच्या प्रांगणात येईतोवर नाही म्हटले तरी थोडा उशीरच झाला होता. कार्यक्रम सुरु होण्यापूर्वीच सभागृह भरून गेले होते. शिल्पा व तिच्या मैत्रीणी वाट काढत कशाबशा मागच्या रांगेत आसनस्थ झाल्या.

वक्ते खूपच छान बोलले. आपला प्रतिपाद्य विषय रंगतदार करण्यासाठी त्यांनी काही स्लाईडस् दाखवल्या. त्यांचे मार्गदर्शन सर्वांनाच अंतर्मुख करणारे होते. ''आजचे दैनंदिन जीवन खरोखरीच किती व्यापलेले आहे नाही!'' शिल्पाने पूजाला विचारणा केली खरेच, हे व्याख्यान ऐकले नसते तर आपल्याला या भीषणतेची कल्पनाच आली नसती.

कार्बन हा प्लॅस्टिकमधील प्रमुख घटक आहे. भूमीजन्य वा समुद्रजन्य तेल तापवून प्लॅस्टिक मिळविले जाते. प्लॅस्टिक मधील सेल्यूलोज गरम तेलावर तापवून त्याला हवा तो आकार देता येतो. प्लॅस्टिकचा पृष्ठभाग गुळगुळीत असतो व तो रबराप्रमाणे ताणला जात नाही. अल्पखर्चात निर्माण होणाऱ्या प्लॅस्टिकचा शोध अलेक्झांडर पार्कने लावला. १९५० पासून हळूहळू वापरले जाणारे प्लॅस्टिक १९६० च्या दशकात अधिक वेगाने वापरात यायला लागते. प्लॅस्टिक गंजत नाही. वजनाने हलके असते. त्याची किंमतसुद्धा किफायतशीर असते. म्हणूनच जनसामान्यांच्या जीवनात त्याचा सहजतेने शिरकाव झाला.

वक्त्यांनी सांगितलेली सोदाहरण माहिती मनात साठवतच मुली निघाल्या होत्या. त्यांच्या व्याख्यानाचे मुद्देही त्यांनी आवर्जून टिपून घेतले होते.

घरी येताच शिल्पाने सवयीने आपला टी.व्ही. सुरु केला तर तिच्या लक्षात आले की आपला टी.व्ही. सुद्धा प्लॅस्टिक मोल्डच आहे. आपले ओळखपत्र कपाटात ठेवता ना ते प्लॅस्टिक लॅमिनेटेड आहे याकडे तिचे लक्ष वेधले गेले. घराच्या टेरेसवरील पाण्याची टाकी, घरातील मॅटिंग, दरवाजावरील बेल या सर्वच गोष्टीत प्लॅस्टिकचा वापर होता. थोड्याच वेळात बेल वाजली. दार उघडताच प्लॅस्टिक कॅरीबॅग मधून भाजीपाला घेऊन आलेले बाबा दिसले.

वक्त्यांनी सांगिलेली प्लॅस्टिकची दुसरी बाजू शिल्पाला आठवू लागली. प्लॅस्टिकचे विघटन होत नाही. त्यातील रसायने अत्यंत घातक असतात. त्यांना जंतूसंसर्ग होऊ शकत नाही. प्लॅस्टिकची विल्हेवाट लावायला हजार वर्षांचा कालावधी लागतो. त्यावर कोणत्याच रसायनांचा परिणाम होत नसल्याने खराब झालेले प्लॅस्टिकची विल्हेवाट लावणे हा डोकेदुखीचाच विषय झाला आहे. प्लॅस्टिक आरोग्यावर विघातक परिणाम करते. त्यातील रासायनिक घटक शरीरात जाऊन मेंदू, फुफ्फुसे यावर अनिष्ट परिणाम करतात. जाळले तरी त्याचा विषारी धूर हवेचे प्रदूषण घडवितो. पाण्यात टाकल्यास पाणी प्रदूषण होते. जमिनीखाली गाडले तर नैसर्गिक अन्नसाखळी प्रदूषित होते. जमिनी नापीक होतात. त्यांचा कस कमी होतो. मुंबईसारख्या महानगरात सागर तळाशी प्लॅस्टिक टाकण्याचे दुष्परिणाम दिसून आले आहेत. दरवर्षी सुमारे २ कोटी मासे मरत आहेत. डॉल्फिन, देवमासे, सील, सी लायन या जलचरांचे जीवन धोक्यात आले आहे.

शिल्पाला रोजच्या जीवनातील उदाहरणे आठवू लागली. तिच्या घरापासून जवळच असणारी कचराकुंडी बहुतांश प्लॅस्टिक पिशव्यांनीच भरली होती. भटकी कुत्री आणि गाई या पिशवीतील खाद्यापदार्थांपायी या पिशव्या -- आणि गेल्या वर्षी तर सखूनानाची गाय दगावली. प्लॅस्टिकचा जंतूसंसर्गाचा प्रादूर्भाव होऊन गायीची चयापचय क्रिया बिघडली होती. अन्ननलिकेवर विघातक परिणाम झाला होता. सखूनानाप्रमाणेच इतरांच्याही गुरा-ढोरांना प्लॅस्टिकची बाधा होत असणारच हे सुज्ञ शिल्पाच्या ध्यानी आले.

रविवारी मैत्रीणींचा घोळका एकत्र आला. स्पर्धापरीक्षेची तयारी म्हणून त्या नेहमी गटचर्चा करीत, यावेळी गटचर्चेसाठी विषय होता तो प्लॅस्टिकचाच! प्लॅस्टिक शहरातच नव्हे तर राना-शिवारात, डोंगरात, खेड्यात आले आहे हे त्यांना कळून चुकले. रोजच्या दुधाच्या पिशव्या प्लॅस्टिकच्या असतात. आईच्या दुधाला पर्याय म्हणून एखादे बाळ दूध पिते ते प्लॅस्टिकच्या बाटलीतूनच! हव्या त्या रंगात आणि रूपात, आकारात उपलब्धता हे प्लॅस्टिकचे वैशिष्ट्य ! चर्चेतून मुलींच्या डोक्यात लख्ख प्रकाश पडला. डबे, पॅकिंग मटेरियल, दागिने, इलेक्ट्रिक सामान, दवाखाने अशा कितीही ठिकाणी प्लॅस्टिकने आपले हातपाय अक्राळ-विक्राळतेचे पसरलेत यावर मुलींचे एकमत झाले.

पेट्रोपॅक, थर्माकोल, अॅल्युमिनियम, स्वयंपाकाची भांडी, बाटल्या ही प्लॅस्टिकचीच रूपे आहेत. पर्यावरणाच्या प्रदूषणाला तितकीच जबाबदार आहेत. विज्ञानविषयक मासिकातून अधिक माहिती संकलित करताना जाणवले की, सूर्याचे Ultra violet (अतिनील) किरण वातावरणातील प्लॅस्टिकवर पडतात व त्यामुळे होणाऱ्या रेडिएशनमुळे विषाणू Toxins तयार होतात. ते वातावरणात मिसळले की, कॅन्सरसारखा दुर्धर व्याधी जडू शकतात. एकट्या मुंबईतच रोज सुमारे ८०,००० टन प्लॅस्टिक कचरा आढळतो. चहा-कॉफीचे युज अँड थ्रो ग्लास, मिनरल वॉटरच्या बाटल्या रॅपर्स, असा हा कचरा असतो. प्लॅस्टिक पिशवीने गटारी तुंबतात. पाण्याच्या पाईप्स तुंबतात. घर, संस्था, दुकाने, कारखाने, रस्ते, शाळा- महाविद्यालये या सर्वच ठिकाणी प्लॅस्टिकचे दर्शन नित्याचे झाले आहे.

प्लॅस्टिकचे समुळ उच्चाटन अशक्यच आहे. निदान वापर कमी करता येणे शक्य आहे. हॉस्पिटलमध्ये त्याचा ९०% वापर होतो. विमान बांधणी, मोटार बांधणीत, इमारत बांधणीत प्लॅस्टिकचे दिलेले योगदान मोलाचे आहे. ते उपयुक्त आहे. वाजवी किंमत व हलक्या वजनाने ग्राहक आकर्षित होतात हे ही खरेच आहे.

बाजारात प्लॅस्टिक पिशव्या विकणारे दलाल, छुप्या पद्धतीने येतात १० रु.च्या धंद्यासाठी ५० पैशांची पिशवी द्यायला विक्रेताही तयार नसतो पण ग्राहकाच्या मागणीमुळे नाईलाज होतो. ४० ते ६० रुपयांना ८० ते १०० पिशव्या वितरित केल्या जातात.

क्रेंद्रिय प्रदूषण नियामक मंडळाने किमान ४० मायक्रॉन गाडीची पिशवी असावी असे सांगितले आहे. तर राज्य प्रदूषण नियामक मंडळ ५० मायक्रॉनच्या पिशवीचा निकष घालून देते पण बाजारातील पिशव्या तर ३० ते ४० मायक्रॉनच्या आहेत. भाजीच्या पिशव्या तर २० मायक्रॉन जाडीच्या असतात.

ऑस्ट्रेलियातील सिडनीत प्लॅस्टिकच्या पुनर्वापरासाठी व्हेडिंग मशीन्सचा वापर केला गेला. त्यातून कॅन, पॅक तयार केले. बसची तिकीटे बनवली गेली. तीन दिवसात १० कॅन पॅक तयार झाले. असे प्रयोग आवश्यक आहेत.

रिड्युस, रियूज व रिसायकल या त्रिसूत्रीचा वापर हवा. ५०% आहेत. भाजीच्या पिशव्या तर २० मायक्रॉन जाडीच्या असतात.

ऑस्ट्रेलियातील सिडनीत प्लॅस्टिकच्या पुनर्वापरासाठी व्हेडिंग मशीन्सचा वापर केला गेला. त्यातुन कॅन, पॅक तयार केले. बसची तिकीटे बनवली गेली. तीन दिवसात १० कॅन पॅक तयार झाले. असे प्रयोग आवश्यक आहेत.

रिड्युस, रियूज व रिसायकल या त्रिसूत्रीचा वापर हवा. ५०% प्लॅस्टिक पुन्हा वापरात यावे. संशोधक स्टार्च मिश्रित प्लॅस्टिक कण आहेत. त्यामुळे प्लॅस्टिकचे विघटन होईल. -- वसुंधरा प्रदूषण मुक्त होईल.

शासनाने बंदी घालून वा नियम करून ही समस्या सुटणार नाही. प्रबोधन नागरिकांचे प्रत्यक्ष सहकार्य आवश्यक आहे. नागपुरातच ३१ कारखाने आहेत. त्यातील २१ व्हर्जिन (प्लॅस्टिक -- प्लॅस्टिक निर्माण करणारे) तर १० पुनर्निर्मित करणारे आहेत. लक्षावधी लोकांना प्लॅस्टिकने रोजगार दिलाय. परंतु विघटनशील प्लॅस्टिक तयार होईपर्यंत ईश्वराने बहाल केलेली सृष्टी स्वच्छ सुंदर प्रदुषणमुक्त ठेवणे ही आपली जबाबदारी आहे.

बापरे! शिल्पाचे डोके गरगरायला लागले. मंगल म्हणाली, 'चल छोड यार! एवढे कशाला टेंशन घेतेस, हा आपला महान भारत आहे. नाहीतरी आपल्या कार्यक्रमानंतर आपण यूड अँड थ्रो ग्लासमधूनच चहा प्यालो. आपल्याला वडे दिले ते सुद्धा प्लॅस्टिक कॅरीबॅगेमधूनच आले होते आणि 'स्वच्छ कँपस'? दिनावेळी आपण प्लॅस्टिकमुळे होणाऱ्या हवा प्रदूषणाचा विचारही न करता आपल्या परिसरातील पिशव्या जाळून टाकल्या नाहीत का? यावर सगळ्यांच हसल्या, परंतु सगळ्याच अंतर्मुखही झाल्या होत्याच.'

***

# आजची युवापिढी (स्वतःचा अनुभव)- ललित लेख

विक्रम एस. कांबळे – बी.कॉम. भाग १

काय सांगु मित्रानों आजची युवापिढीविषयी कोणीतरी म्हटलेलं आहे, आजच्या पिढीमध्ये आपला उदयाचा भारत दडलाय. आणि आजची युवापिढी उद्याचा भारत घडवणार. खरंच जर वास्तव आहे. तर काय भयाण परिस्थिती आहे. खरंच असं घडलं तर मला तर कल्पनाच करवत नाही. कारण मित्रांनो ज्या भारतात आपण ज्यांचा सतत उल्लेख करतो. आणि करायलाच पाहीजे असे आपले प्रौढप्रताप पुरंदर श्री श्री छत्रपती शिवाजी महाराज, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, छ.शाहू महाराज, छत्रपती संभाजी महाराज भगतसिंग, सुखदेव, राजगुरू, एवढंच काय आताच झालेल्या २६ः११ च्या कामगिरीतले तुकाराम करकरे तेव्हाचं शिक्षणसम्राट महात्मा जोतिराव फुले,लोकमान्य टिळक अशी आताची सुद्धा भरपुर अशी आपल्या डोळ्यासमोर थोर पराक्रमी योद्ध्याची नावे अगदी आदराने घ्यावी अशी किंवा त्यांचे थोर विचार आपल्या हृदयात ठेवण्यासारखे आहेत. मला वैयक्तिक कोणाला दुःखवायचा हेतू नाही. फक्त मी एवढंच म्हणेन की ही सुद्धा रत्न आपल्याच मातीतली आपल्याच या महान देशातीली आहेत ना? काही कोठून आभाळातून पडलेली होती? अहो त्या वेळी महात्मा जोतिराव फुलेंसारख्या थोर महापुरूषांने पुढे येवून जर आपल्या पत्नीला शिकवून मुलींसाठी शाळा काढल्य नसत्या तर काय झालं असतं विचारचं करता आला असता का? निदान जे युवा मुली पाहण्यासाठी तरी कॉलेज मध्ये किंवा शाळेमध्ये आले असते का? अहो नाही ना? बघा यावरून तरी आपल्याला समजले की जोतिराव फुले माता सावित्री बाई फुले लक्षात राहील्या. बघा किती मोठं काम केलं त्यांनी.अहो जरा विचार करा जर शाळेत मुलीचं नसत्या तर?मुळात माझा मुद्दा तो नाहीच आहे. पण मित्रांनो अशी परिस्थितीच आहे बघा, मुलगा बाहेर जाताना घरातून सांगतो की,आई - बाबा मी कॉलेज किंवा शाळेत चाललोय गं? पण त्या बिच्याऱ्यांना तर कुठं माहीत असतं कि माझा मुलगा शाळेतच जातोय ना? ते आपल्यासाठी उन्हा-तान्हात घाम गाळून आपली त्या उन्हानं कातडी सोलस्तवर मरतात. पण मुलग्याच किंवा मुलीचं काय वेगळचं, वास्तवात मुलगा कॉलेजमध्ये आठ-पंधरा दिवस नसतोच, इथे वास्तव वेगळचं मग काय याची गाडी घे, पेट्रोल घाल, त्याला पार्टी दे हाच प्रकार आणि काय तर बरोबर शाळा किंवा कॉलेज सुटण्याच्या वेळेत तेथे हजर मग मित्रांनो मी पहिला ज्यांचा उल्लेख केला ते पण आपल्याच भारत देशातील ना? आपण काय वेगळे आहोत का? मग आपल्याला जन्म देणाऱ्या माता-पिता कुठं कमी पडलेत का? आपल्यावर चांगले संस्कार करण्यात काय झालं ? मग आजची युवा पिढी कुठं आहे. आपली संस्कृती कुठं असतेय कॉलेजसमोर एखादं छानस हॉटेल असत. त्याच्यापुढे किंवा मागेमाग एखाद पानपट्टीचा छोटा गाडा, स्टॉल मग कॉलेजला जाणाऱ्या येणाऱ्या मुलींकड इतकचं काय ६०-७० वर्षाची बाई सुद्धा आम्हाला ‘टवका’ दिसते.मग त्या मुलींच्या मागं जा-पुढ फिर तिला बस स्टॉप पर्यंत सोड. इतकच काय पुढंमाग न विचार करता तिला प्रपोज कर. मग त्या मुलीन नकार दिल्यास तिचा छळ कर मित्रांना गोळा कर तिचा काटा काढ. अहो लाज वाटली पाहीजे आम्हाला, अहो आम्ही लहरीच्या नादी लागून हेही विसरतो की, तिला पण कोठतरी तिच्या आई वडीलांनी मोठ्या हौसेन आपली परिस्थिती नसताना तुमच्या आमच्या सारखं कॉलेजला पाठवले असेल ना? तिला पण आपल्यासारखी तरी बहीण-भाऊ असतील ना? मग आपण अस का मानत नाही की ती पण आपल्यासारखी कोणाची बहीण आहे. मुलगी आहे. मग काय ती कोणाशीही बोलूच शकत नाही. तिचे कोण मित्र मैत्रिणी असू शकत नाही का? का नाही विचार करत अहो एखादी मुलगी कॉलेजला जातो किंवा शाळेला जातो म्हणून सांगून जेव्हा घरातून बाहेर पडते तेव्हा तिच्या आई-वडीलांचे डोळे तिच्या वाटेकडे लागलेले असतात. आणि आपली मात्र कंडीशन वेगळीच असते. जरा ती मुलगी बघायची फुरसत, आपण मात्र एखाद्या कावळ्यासारखं तिच्या पाठीमागे पडतो. अहो काय हे? मुलगी जरा वेगळ वागली की ८० वर्षाचे म्हातारे ही अगदी कॉलजकुमार असल्यासारखं वागतात. पण हे खरंच कुठतरी बदलल पाहीजे. खरंच आपल्या नजरेतून कॉलेज म्हणजे काय तरं वाटत आता आपण स्वत:च्या मर्जीचे मालक पण मित्रांना असं नाही. खरं तर कॉलेज म्हणजे आपल्याला

प्रुव्ह करण्यासाठी नशिबानं दिलेली दुसरी संधी. ही तेंव्हा आपण मॅच्युअर होतो. तेंव्हा तर आपल्याला समजल पाहीजे की मुली बघणं सरांना ओरडण किंवा त्यांच्यावर दबाव टाकणं आणि उधार उसणवारी करून कोणाची तरी गाडी किंवा मग वडीलांनी कर्ज काढून घेवून दिलेल्या गाडीवर एखाद्या मुलीला फिरवणं, खाणं म्हणजे कॉलेज का? आणि ही आपली युवापिढी अरे या देशात असे अनेकजण अन्नाच्या, पाण्याच्या एका थेंबावाचून मरतात. जे दिवसा काम करून मुंबईसारख्या ठिकाणी रस्त्यावर झोपतात आणि आपला व आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात. ही देशाची युवापिढी, की आपण स्वत: एक डॉक्टरकीय शिक्षण घेतले आहे. आणि आपण दुसऱ्या डॉक्टराच्या हॉस्पिटलमध्ये त्याच्या हाताखाली काम करणारी युवापिढी, की व्यसनाच्या आहारी जावून बिघडलेली युवापिढी की बाबा खरचं आपल्या गरीबीचा अनुभव घेवून ती सुधारण्यासाठी प्रयत्न करणाऱ्या मित्रांना मागे खेचणाऱ्या प्रवृत्तीचे युवापिढी की फक्त इलेक्शनच्याच वेळी एखाद्या नेत्याच्या मागे मान डुलवत मागे फिरणारी युवापिढी की, ती युवापिढी जी स्वत: केलंल माफ आणि दुसऱ्यानं केलं की साफ करणारी युवापिढी, का ती युवापिढी जी आपण एखाद्या मुलगीला गडकिल्ल्यांवर फिरायला जाणे, दारू पिणे, फोटो काढणे आणि सोशल मिडीयावर अपलोड करणे. आणि आपणच सांगणे कि शिवाजी महाराजांचा अपमान होईल असे कृत्य करणाऱ्यास माफ केले जाणार नाही? हे सांगणारी युवापिढी, की आता घडलेली कोपर्डी/खैरांजली असे असो किंवा दिल्ली असो कित्येक वासनेच्या आहारी जाणारी आणि कृत्ये करणारी युवापिढी, की आत्ताच जिवंतपणी आपल्या आईवडीलांना मरण दाखवणारी युवापिढी की एखाद्याचा गुन्हा नसतांना देखील त्यात Involve करणारी युवपिढी आणि आपणच गुंड घेवून येवून मारहाण करणारी युवापिढी, की आत्ताच्या या सोशलमिडीयावर भरकटत जाणारी युवापिढी काय कुठली कुठली म्हणून युवापिढी सांगायची की दिवसाचे १८-१८ तास अभ्यास करून आपले काम सांभाळणारी युवापिढी की यवतमाळ मध्ये एका गरीब कुटुंबात जन्म घेवून स्मशानभूमीत अभ्यास रात्रभर करून ९५% मार्क्स किंवा १००% मार्क्स मिळवून पुढे IPS होण्याचे इंजिनियर, डॉक्टर्स, C/A होण्याचे स्वप्न ठेवणारी त्यासाठी अहोरात्र झटणारी युवापिढी कुठली सांगू ही आजची युवापिढी आजची यंग जनरेशन काय सांगू आणि किती सांगू की कोपर्डी-दिल्ली, मुंबई, खैरांजली सारखे गुन्हे होत असतांना बघत बसणारी आणि फोटो काढणारी युवापिढी आज रस्त्यावर जरी एखादा ॲक्सिडेंड झाला तर, त्याला वाचवायला जाण्याआधी तेथे फोटोज घेणारी युवापिढी की त्याची काहीच चुकी नसतांना त्याला पहिला आपल्या इंडियामध्ये कुत्र्यासारखा मारणे. आणि त्याच्याकडून नुकसान भरपाई उकळणे ही युवापिढी कुठली कुठली म्हणून सांगायची आणि आम्हांला दहावी बारावीला किंवा ग्रॅज्युएशनला विषय असतो. की आजची युवापिढी आम्ही काय सांगणार हे म्हणजे असं झालं स्वत:च्याच तोंडून स्वत:चे गाऱ्हाणे ऐकून घेणे काही लिहायचं. आणि तर काय आता आपल्या हातात स्मार्टफोन खिश्यापेक्षा फोन मोठा आणि आमचे देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणतात. की, भारत डिजीटल इंडिया झाला पाहीजे. सगळ अगदी online पण त्यांना हे कुठ माहित आहे. की माझा शेतकरी नेहमीच ofline नच असतो. पण तो आपल्या मुलाला मात्र नेहमी online ठेवतो ही खरी माझ्या देशाची डिजिटल इंडिया सर्व्हिस आहे. मुलगा दिवस असो रात्र असो नेहमी online बघा आणि मग त्या विराटनं अनुष्काला घास भरवला. बंड्या दररोज what's up बघतो. ऐका. तिकडं माझा बाप त्या online च्या रीचार्जसाठी चार दिवस मरतोय. मग facebook, what's up, hike आणि काय, काय आहे की, ती online बस गप्पा मारत ही माझ्या देशाची युवापिढी शेवटी मी माझ्या युवापिढीला एवढच सांगू इच्छितो की, कवी कुसुमाग्रज म्हणतात की,

पन्नाशीची उमर गाठली
अभिवादन मज करू नका
मीच विनवितो हात जोडुनी,
वाट वाकडी धरू नका
गोरगरीबा छळू नका
पिंड फुकाचे गिळू नका
गुणी जणांवर जळू नका

(माझ्या मनातील भावना)

क्षमस्व :

***